महापालिका सहाय्यक आयुक्त
वारजे कर्वेनगर कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. ५१८८
दि. ८/१०/२०२१

## कार्यालयीन आदेश

विषय:- कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण)अधिनियम -२०१३, डी. २२/०४/२०१३ व नियम दि.०९/१२/२०१३ च्या नियम अधिनियमातील कलम ४ (१) नुसार प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेबाबत.

संदर्भ:- १. महिला व बाल कल्याण विभाग शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/ प्र.क्र.६३/ मकक, दि.१९/०६/२०१४.
२. आस्थापना विभाग कार्यालय, पुणे महानगरपालिका जा.क्र. आस्था/ ४५०५ दि.२४/०८/२०२१.

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयामधील कामाच्या ठिकाणी महिलांवर होणाऱ्या लैगिक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी प्रत्येक कार्यालयात अंतर्गत तक्रार समिती गठीत करणेबाबत संदर्भ क्र. १ नुसार शासन निर्णय प्राप्त झाला आहे.

वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयामधील महिला अधिकारी/सेविकांच्या तक्रारीबाबत चौकशी करण्यासाठी अंतर्गत तक्रार समिती खालीलप्रमाणे गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव | हुद्दा | कार्यालयाचे नाव | तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. अनिता दिलीप हक्के | वरिष्ठ लिपिक | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | अध्यक्ष | |
| २ | श्रीम. संगीता मल्लेश तुपदर | लिपिक टंकलेखक | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | सदस्य | |
| ३ | श्रीम. विद्या प्रकाश पवार | शिपाई | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | सदस्य | |
| ४ | श्री. अशोक पांडुरंग भवारी | उप अधिक्षक | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | सदस्य | |
| ५ | श्रीम. सुजाता शिवदास करवंदे | समुपदेशक | वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय | सदस्य | |

वरील अंतर्गत तक्रार समितीच्या कामकाजाची खालीलप्रमाणे कार्यकक्षा राहील:

- सदर समितीची मुदत हि तीन वर्षाकरिता म्हणजे कार्यालयीन आदेशाच्या दिनांकापासून पुढे तीन वर्षे पर्यंत राहील.
- लैंगिक सतावणूकीच्या तक्रारींची दखल घेणे व प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अधिनियमामध्ये घालून दिलेल्या तरतुदीनुसार चौकशी करणे.
- तक्रारीत तथ्य आढळून आल्यास याबाबत शोध घेवून शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरिता शिफारस करणे.
- शिस्तभंगाच्या कार्यवाहीचा आढावा घेणे.

- शासनाने वेळोवेळी प्रसृत केलेले शासन निर्णय, परिपत्रक याद्वारे केलेले बदल यांच्या अधिन राहून कार्यवाही करणे.
- मा. महापालिका आयुक्त यांना मासिक अहवाल व शासनाला या संबंधी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल सादर करणे.

( राजेश गुर्रम )
प्र.महापालिका सहाय्यक आयुक्त
वारजे कर्वेनगर कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रत – माहितीसाठी
आस्थापना विभाग कार्यालय
पुणे महानगरपालिका